पोलीस अधीक्षक कार्यालय,
गडचिरोली दिनांक १८/०९/२०१७

# *नक्षलवादयाचा कुटील डाव हाणून पाडण्यात पोलीस दलास यश*

दिनांक १८/०९/२०१७ रोजी उपविभाग एटापल्ली अंतर्गत येणाऱ्या पोमके गट्टा (जां) हद्दीत पोमके गट्टा (जां) येथील अधिकारी/कर्मचारी हे नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना नक्षलवादी केलेल्या हल्ल्यात क्लेमोर माईन स्फोट व हल्ला परतवून लावण्यास पोमके गट्टा (जां) पोलीसांना यश मिळाले.

उपविभाग एटापल्ली अंतर्गत येणाऱ्या पोमके गट्टा (जां) येथील अधिकारी व कर्मचारी यांनी नक्षलविरोधी अभियान राबवित असतांना जांभिया नाला दरम्यान नक्षलवादयांनी पेरुन ठेवलेला क्लेमोर माईनचा स्फोट घडवून पोलीसांच्या दिशेने जिवे मारण्याचा उद्देशाने गोळीबार केला पोलीसांनीही स्वसंरक्षणार्थ प्रत्युत्तरादाखल नक्षलवादयांचा दिशेने गोळीबार केला असता पोलीसांचा वाढता दबाव पाहून नक्षलवादी जंगलात पळून गेले. यामध्ये क्लेमोर पाईप, बॅटरी, स्प्रींटर्स, वायर बंडल, हस्तगत करण्यात आले.

तसेच एटापल्ली ते हेडरी रोडवर नक्षलवादयांनी एक भुसुरुंग पेरला होता. तो पोलीस दलाच्या सर्तकतेमुळे मिळून आला. बॉम्ब शोधक व नाशक पथकाच्या मदतीने तो जागीच निकामी करण्यात आला. बॉम्ब निकामी केलेल्या जागी ४ फुट खोल खड्डा पडलेला आहे.

गडचिरोली पोलीस दलाच्या सतर्कतेमुळे पुन्हा एकदा नक्षलवादयांच्या घातपातास परतून लावण्याची कामगिरी गडचिरोली पोलीस दलामार्फत करण्यात आली. यापुर्वीही ०९/०९/२०१७ रोजी उपविभाग एटापल्ली अंतर्गत येणाऱ्या पोमके गट्टा (जां) हद्दितील मौजा मेडपल्ली या रस्त्यावर नक्षलवादयांचा भुसुरुंग निकामी करण्यात पोलीसांना यश आले.


SHIVNIRMA
EXIDE



